प्रतिनियुक्तीने नियुक्ती-
भाडे नियंत्रण कायदा न्यायालय,
कोकण विभाग यांचे कार्यालय,
वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन आदेश क्रमांकः प्रतिनि २५१८/प्र.क्र.१०४/१४-अ
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
तारीख: २९ ऑगस्ट, २०१९

शासन आदेश

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : एसआरव्ही २०११/प्र.क्र.१३७/का.१२, दिनांक १७.१२.२०१६ अन्वये प्रतिनियुक्तीचे धोरण निश्चित करण्यात आले असून, मंत्रालयीन संवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांच्या प्रतिनियुक्तीबाबत करावयाची कार्यपध्दती सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण २०१७/प्र.क्र.१२०/१४, दिनांक ३१.८.२०१७ च्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आली आहे. या शासन निर्णयातील तरतूदीनुसार या विभागाच्या दिनांक १७-०७-२०१८ च्या पत्रान्ये मंत्रालयीन विभागातील सहायक कक्ष अधिकारी संवर्गातील कर्मचाऱ्यांकडून भाडे नियंत्रण कायदा न्यायालयाच्या विविध कार्यालयातील अधिक्षक, वर्ग-२ चे १ रिक्त पदे प्रतिनियुक्तीने भरण्याबाबत इच्छुकता मागविण्यात आली होती. मंत्रालयीन विभागाकडून भाडे नियंत्रण कायदा न्यायालय, कोकण विभाग, मुंबई या कार्यालयासाठी दिनांक २१-०८-२०१८ पर्यंत इच्छुकता प्राप्त न झाल्यामुळे तसे गृहनिर्माण विभागास कळविण्यात आले होते. भाडे नियंत्रण कायदा न्यायालय, कोकण विभाग, मुंबई या कार्यालयाची कामाची तातडी विचारात घेवून गृहनिर्माण विभागाने त्या विभागातील श्री.वि.पां.लोखंडे, सहायक कक्ष अधिकारी यांची भाडे नियंत्रण कायदा न्यायालय, कोकण विभाग, मुंबई या कार्यालयासाठी "अधिक्षक (गट-ब) या पदावर त्यांची सेवा उसनवारी तत्वावर दिनांक २६-१०-२०१८ च्या आदेशान्वये उपलब्ध करुन दिली होती. सदरहू आदेशान्वये भाडे नियंत्रण कायदा न्यायालय, कोकण विभाग, मुंबई या कार्यालयात रुजू होण्यासाठी दिनांक २६-१०-२०१८ (म.नं) गृहनिर्माण विभागातून दिनांक २६-१०-२०१८ च्या कार्यालयीन आदेशान्वये कार्यमुक्त करण्यात आले होते. त्यानुसार श्री.वि.पां.लोखंडे,स.क.अ. हे भाडे नियंत्रण कायदा न्यायालय, कोकण विभाग, मुंबई येथे दिनांक २७-१०-२०१८ पासून उसनवारी तत्वावर कार्यरत आहेत.

२. सक्षम प्राधिकारी, भाडे नियंत्रण कायदा न्यायालय, कोकण विभाग, मुंबई यांनी श्री. लोखंडे यांची नियुक्ती ही उसनवारी तत्वावर असल्याने सक्षम प्राधिकारी, यांना न्यायदानाच्या कर्तव्याबरोबरच आहरण व संवितरण अधिकारी या पदाची कर्तव्य पार पाडावी लागत आहेत. श्री.लोखंडे यांची नियुक्ती उसनवारी तत्वाऐवजी प्रतिनियुक्तीवर असेल तर त्यांच्याकडे आहरण व संवितरण अधिकारी या पदाचा कार्यभार सोपविता येईल व ते सदरचा कार्यभार पार पाडण्यास

सक्षम आहेत" असे त्यांच्या दिनांक २७-०६-२०१९ च्या पत्रात नमूद केले आहे. यास्तव भाडे नियंत्रण कायदा न्यायालय, कोकण विभाग, येथे श्री. लोखंडे यांची, उसनवारी ऐवजी प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्याची शिफारस केली आहे.

३. वर परिच्छेद २ मधील वस्तुस्थिती विचारात घेता श्री. वि.पां.लोखंडे, सहायक कक्ष अधिकारी यांची सेवा गृहनिर्माण विभागाच्या अखत्यारीतील भाडे नियंत्रण कायदा न्यायालय, कोकण विभाग, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१ या कार्यालयातील “अधिक्षक वर्ग-२ ” या पदावर प्रतिनियुक्तीने उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

अ.क्र.	सहायक कक्ष अधिकाऱ्याचे नांव व विभाग	प्रतिनियुक्तीचे ठिकाण	प्रतिनियुक्तीच्या ठिकाणावरील पद
१	२	३	४
१.	श्री. वि.पां.लोखंडे, गृहनिर्माण विभाग	भाडे नियंत्रण कायदा न्यायालय, कोकण विभाग, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१.	अधिक्षक वर्ग-२

२. श्री. वि.पां.लोखंडे, सहायक कक्ष अधिकारी, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई यांची भाडे नियंत्रण कायदा न्यायालय, कोकण विभाग, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१, या कार्यालयात **प्रथमत: एक वर्षाच्या** कालावधीसाठी खालील अटी व शर्तीनुसार प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात येत आहे.

(अ) ज्या तारखेला शासकीय सेवेतील पदाचा कार्यभार सुपुर्द करील त्या तारखेपासून प्रतिनियुक्तीच्या सेवेचा प्रारंभ होईल आणि ती सेवा ज्या तारखेला संबंधित कर्मचारी आपल्या शासकीय पदाचा कार्यभार पुन्हा स्विकारील त्या तारखेला समाप्त होईल.

(ब) जर त्यांची सेवा लोकसेवेच्या हिताच्या दृष्टीने शासनाला आवश्यक वाटली तर प्रतिनियुक्तीचा कालावधी संपण्यापूर्वी कोणत्याही वेळी त्याला परत बोलावून घेण्याचा अधिकार शासन/संवर्ग नियंत्रण अधिकारी/सक्षम प्राधिकारी राखून ठेवील

(क) जर त्यांची सेवा स्वीयेत्तर नियोक्त्याला आवश्यक वाटली नाही तर त्याला मूळ विभागाकडे परत पाठवण्याची मुभा स्वीयेत्तर नियोक्त्याला राहील. मात्र याप्रमाणे परत पाठवण्यापूर्वी स्वीयेत्तर नियोक्त्याने शासनाला/सक्षम प्राधिकाऱ्याला तीन महिन्यांची नोटीस दिली पाहिजे; आणि

(ड) त्याने मूळ विभागाकडे परत जाण्याचा आपला उद्देश आहे अशी कमीत कमी तीन महिन्यांची लेखी नोटीस शासनाला/सक्षम प्राधिकाऱ्याला दिल्यानंतर त्याला मूळ विभागाकडे परत येण्याची मुभा राहील.

३. प्रतिनियुक्तीच्या कालावधीत संबंधित कर्मचाऱ्यांना प्रतिनियुक्ती भत्ता देय असणार नाही. म.ना.से.(पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा...इ.) नियम १९८१ मधील नियम ४० (परिशिष्ट दोन) व सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, दिनांक १७-१२-२०१६ व १६-०२-२०१८ मधील तरतुदी विचारात घेऊन, गृहनिर्माण विभाग (आस्थापना) यांनी प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्ती याबाबत गृहनिर्माण विभाग/गृनिधो १ यांच्याशी सल्लामसलत करुन ठरवाव्यात.

४. श्री. लोखंडे, सहायक कक्ष अधिकारी, गृहनिर्माण विभाग यांच्या इतर सर्व प्रशासकीय बाबी त्यांचे प्रशासकीय विभाग आणि गृहनिर्माण विभाग/गृनिधो-१ यांचेमार्फत हाताळण्यात येतील

५. श्री. लोखंडे हे उसनवारी तत्वावर भाडे नियंत्रण कायदा न्यायालय, कोकण विभाग, मुंबई येथे कार्यरत असल्यामुळे त्यांना कार्यमुक्त करण्याची आवश्यकता नाही.

६. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८२९१३०४२९४००७ असा आहे. सदरहू आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Gajanan Bhimrao Gurav

Digitally signed by Gajanan Bhimrao Gurav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8a5b973b0795ae988a7c005050f9180a8021798a5c1ed41ada8a72725a47b4f0, serialNumber=54b11b1ccbdc577d71dce3b313c3fef5dc2ad659e360f73b682d6b6fccb8aecf, cn=Gajanan Bhimrao Gurav
Date: 2019.08.29 13:13:05 +05'30'

(ग.भि.गुरव)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

श्री.वि.पां.लोखंडे, सहायक कक्ष अधिकारी, भाडे नियंत्रण कायदा न्यायालय, कोकण विभाग, मुंबई, (या कार्यालयामार्फत)

प्रत,

१) अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

२) अ.मु.स./प्रधान सचिव/सचिव, गृहनिर्माण विभाग (आस्थापना/गृहनिधो-१,) मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

३) सक्षम प्राधिकारी, भाडे नियंत्रण कायदा न्यायालय, कोकण विभाग, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१.

४) सह/उप सचिव (आस्थापना), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२.

त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांच्या विभागातील संबंधित सहायक कक्ष अधिकारी यांच्या सेवा प्रतिनियुक्तीने उपलब्ध करुन देताना परिच्छेद ३ मध्ये नमूद केल्यानुसार कार्यवाही करुन काढण्यात आलेल्या आदेशाची प्रत या कार्यासनाकडे तात्काळ पाठविण्यात यावी.

५) सह/उप सचिव (गृनिधो-१), गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

६) सा.प्र.वि./का.क्र.१४-अ (संग्रहार्थ/निवड नस्ती)